## B.Com. (Part–I) Semester—I Examination

## (Optional Languages)

## MARATHI (Compulsory)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना** :— **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक.

1. भाषा आणि लोकजीवनाचे बंध-अनुबंध डॉ. कुसुमावती देशपांडे यांनी कसे विशद केले आहेत ?

**किंवा**

'भारतीय लोकशाही चे भवितव्य काय ?' या पाठाच्या आधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाहीविषयक विचारांचा आढावा घ्या. 10

2. 'नवीन ग्रंथांची आवश्यकता' या पाठाचा आशय समजावून सांगा.

**किंवा**

'शेती सुधारण्याचे उपाय' या पाठाचा आशय तुमच्या शब्दांत लिहा. 6

3. 'युवा कोण ?' या पाठात बाबा आमटे यांनी कोणता आशावाद व्यक्त केला आहे ?

**किंवा**

'कवितेचा जन्म' या कथेचा आशयविचार तुमच्या शब्दांत लिहा. 10

4. राजे सयाजीराव गायकवाड यांनी मुलींच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्याचा आढावा 'सांजवात' या पाठाच्या आधारे घ्या.

**किंवा**

'वेणू' या पाठातील स्त्रीजीवनाचे दु:ख तुमच्या शब्दांत विशद करा. 6

5. 'पैल तो गे काऊ कोक ताहे' या ज्ञानेश्वरांच्या विराणीचा आशय स्पष्ट करा.

**किंवा**

'शीगवाला' या नारायण सुर्वे यांच्या कवितेचा आशय स्पष्ट करा. 10

6. 'स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य' या कवितेतून मांडलेल्या ख्रिस्ती पुराण कल्पनेचा आशय स्पष्ट करा.

**किंवा**

'हिरीताचं देनं घेनं' या कवितेत बहिणाबाई चौधरी यांनी कोणते जीवनसूत्र सांगितले आहे ? 6

7. वृत्तपत्रांचे स्वरूप विशद करून बातमीलेखन व लेखांचे लेखन कसे करावे ते स्पष्ट करा.

**किंवा**

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रान्ती घडवून आणणाऱ्या नवमाध्यमांविषयी सविस्तर चर्चा करा. 10

8. खालील उतारावाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा :

2050 सालापर्यंत जगाच्या लोकसंख्येत 300 कोटींनी भर पडणार आहे. आजमितीला जगातील पाच माणसांभागे एकाला तहान भागवता येत नाही. 1991 नंतर विकासाचा दर झपाट्याने वाढविणाऱ्या आशिया खंडाला जलसंकटाने वेढा घातला आहे. जपान, सिंगापूर, कोरिया या आशियाई अर्थसत्तांना नैसर्गिक साधनांची कमतरता नाही. मात्र जगाच्या एक तृतीयांश लोकसंख्या असणारे भारत (121 कोटी) व चीन (135 कोटी) हे बलाढ्य देश जलताणाने ग्रासले आहेत. दरडोई, वार्षिक 1700 घनमीटर पाणी उपलब्ध नसेल तर त्या देशावर जलताण आहे, जर पाण्याचा पुरवठा माणशी 1000 घनमीटर पेक्षा घटला तर जलटंचाई, असे संयुक्त राष्ट्रसंघाचे निकष सांगतात. अमेरिकेतील नागरिक दररोज सरासरी 580 लिटर पाणी वापरतो. चीन मधील प्रत्येक व्यक्ती 90 लिटर पाण्याचा वापर करते. भारताच्या शहरात पाण्याचा वापर माणशी 80 लिटर असला तरीही ग्रामीण भागात 50 लिटर सुद्धा मिळणे कठीण आहे. हा पाण्याचा ताण समाजाचं स्थैर्य धोक्यात आणू शकतो, असा इशारा संयुक्त राष्ट्रसंघाने दिला आहे.

कुठलाही देश व त्यामधील सर्वसामान्य जनता जलसुरक्षित आहे काय हे तपासण्यासाठी कॅरोलिन सुलिव्हान व जेर्मी मेग यांनी मानव विकास निर्देशांकाच्या धर्तीवर 'जल दारिद्र्य निर्देशांक' (वॉटर पॉव्हर्टी इंडेक्स) ही व्यापक संकल्पना मांडली आहे. उपलब्ध जलसंपदा, पाण्यापर्यंत पोहोच, पाणी खरेदी करण्याची क्षमता, पाणी वापराची कार्यक्षमता आणि पर्यावरण या पाच निकषांवरुन त्या भागाचा जलनिर्देशांक ठरवला जातो. जलदारिद्र्य निर्देशांक ही संकल्पना मनुष्य विकास निर्देशांकाचाच विस्तार आहे. मनुष्य विकास निर्देशांक अतिशय कमी असणाऱ्या देशांत जलदारिद्र्य तीव्र असणं स्वाभाविक आहे.

2010 सालच्या जलदारिद्र्य निर्देशांकानुसार 147 देशांच्या यादीत फिनलंड हा जलसमृद्ध देश आहे. ह्या यादीत अमेरिका 23 व्या क्रमांकावर, चीन 43 व्या क्रमांकावर तर भारत 53 व्या स्थानावर आहे. हैती, सुदान हे देश यादीच्या तळाशी आहेत. यावरून आर्थिक संपन्नता असणारे राष्ट्र जलसंपन्न असतेच असं नाही; हे स्पष्ट होतं. आर्थिक प्रगती करायची असो वा टिकवायची असो, जलदारिद्र्य निर्देशांकाचं भान ठेवलं तरच भविष्यातील भीषण पाणी समस्येला सामोरं जाता येईल.

—अतुल देऊळगावकर

**प्रश्न** :

(1) जलवाण व जलटंचाईचे निकष सांगा. 2

(2) जलदारिद्र्य निर्देशांक ही संकल्पना कोणी मांडली ? या संकल्पनेचे निकष कोणते ? 2

(3) 'आर्थिक संपन्नता असणारे राष्ट्र जलसंपन्न असतेच असे नाही' हे विधान स्पष्ट करा.

**किंवा**

वरील उतारावाचून त्याचा सुमारे शंभर (100) शब्दांत सारांश लिहा. 2

9. (अ) **एका** वाक्यात उत्तरे लिहा :

(1) 'नवीन ग्रंथांची आवश्यकता' या पाठाचे लेखक कोण ? 1

(2) 'शेती सुधारण्याचे उपाय' हा पाठ कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ? 1

(3) भारतीय लोकशाही आणि जातिव्यवस्थेसंबंधीचे चिंतन कोणत्या पाठातून व्यक्त झाले आहे ? 1

(4) ''भाषेच्या द्वारेच लोकांच्या जीवनातील अनेकविध प्रतीतींना अभिव्यक्ती लाभ ते; आणि त्यांचा विकास होतो'' — हा विचार कोणी मांडला ? 1

(ब) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा :

(1) पुढे शिक्षणखाप्यात स्त्री सुपरिंटेंडेट ...................... आल्या, तेव्हा त्यांनी ही स्थिती पालटून टाकली.

(i) सगुणाबाई देव

(ii) काशीबाई हेर्लेकर

(iii) मिस मेरी भोर 1

(2) जो इतरांपासून ................ भागत नसतो, तो घटनांवर आणि क्षणांवर आपली स्वाक्षरी उमटवतो.

(i) संदेश वा स्वाक्षरी

(ii) क्रान्ती वा भक्ती

(iii) शस्त्र वा अवजारे 1

(3) सर्व वाद वाचले. नुकताच मार्क्सवाद संपवला ......... एक सुंदर गद्यकाव्य वाटले. ग्रेट !

(i) इंडियन सेक्युलर सोसायटी

(ii) आधुनिक मानवाचा संघर्ष

(iii) कम्युनिस्ट जाहीरनामा 1

(4) इतर वक्त्यांची भाषणं न ऐकता ती ............. डोकं खुपसून बसली होती.

(i) एका मासिकात

(ii) एका कोपऱ्यात

(iii) एका टेबलावर 1

(क) योग्य जोड्या जुळवा :

| | | |
|---|---|---|
| (1) तुकाराम | (अ) वट हुकूम | 1 |
| (2) लक्ष्मीबाई टिळकं | (ब) शब्दासाठी जिना मुश्कील है | 1 |
| (3) नारायण सुर्वे | (क) स्मृतिचित्रे | 1 |
| (4) श्रीपाद भालचंद्र जोशी | (ड) अभ्यासासी सांग कार्यसिद्धि | 1 |

(ड) (1) वृत्तपत्र हे सर्वदूर पसरलेले आणि सर्वसामान्यांना परवडणारे असे ................ आहे. 1

(2) ................. हा वृत्तपत्रीय लेखनातला सर्वात महत्वाचा भाग होय. 1

(3) दूरवर लोकांपर्यंत पोहोचू शकणारे ................... हे सुलभ माध्यम आहे. 1

(4) ............... हे एकविसाव्या शतकातील अत्यंत प्रभावी असे साधन आहे. 1